


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९७ ●बुधवार,दि.२८ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# 'लोकांची काम का करतोस...' असं म्हणून धनंजय गुंदेकर यांना पं.स. कार्यालयात मारहाण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर लढा देणारे धनंजय गुंदेकर यांना आमच्या गावातले लोकांचे प्रश्न का सोडवतो आमच्या गावात का येतो असे प्रश्न विचारून पंचायत समिती कार्यालयात मौजचा सरपंच संदीप डावकर याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. शासकीय कार्यालयात सुद्धा अशा घटना घडत असल्याने बीडच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.

बीडच्या कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक म्हणून धनंजय गुंदेकर काम पाहतात. सोबतच शेतकऱ्यांच्या प्रश्नाविरोधात जनजागृतीचं काम देखील ते सातत्याने करत आहेत. मात्र





त्याच्या याच कामामुळे झारीतले शुक्राचार्य बेचैन असल्याचाच पाहायला मिळत आहे. धनंजय गुंदेकर हे लोकांचे प्रश्न घेऊन पंचायत समितीत गेले असता त्या ठिकाणी मौज गावचे सरपंच संदीप डावकर हा देखील तिथेच होता. धनंजय गुंदेकर यांना तू आमच्या गावात का येतोस? लोकांचे प्रश्न का सोडवतोस? असा जाब विचारून मारहाण करण्यास सुरुवात केली. गुंदेकर यांना मारहाण होत असताना तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी डावकर याला आवरण्याचा प्रयत्न केला. सोबतच घटनेचा व्हिडिओ काढून समाज माध्यमावर देखील व्हायरल केला. या घटनेमुळे खळबळ माजली असून बीडच्या कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गुंड प्रवृत्तीची लोक बाहेरच नाही तर शासकीय कार्यालयात देखील कायद्याचा धाक नसल्यामुळे मारहाण करत असल्याचं चित्र पाहायला मिळू लागला आहे. याप्रकरणी धनंजय गुंदेकर यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली आहे.

## आईकडून 11 वर्षांच्या मुलाचा खून; 13 वर्षांच्या मुलीवर चाकूने वार




**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली परिसरात आईने ११ वर्षाच्या मुलाचा चाकूने गळा चिरून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. आईने १३ वर्षीय मुलीवर चाकूने वार केले. या घटनेत मुलगी गंभीर जखमी झाली. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. साईराज संतोष जायभाय (वय ११) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणी सोनी संतोष जायभाय हिला अटक करण्यात आली आहे. ▶उर्वरित पान २ वर

## मंत्री संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत चंपावती महोत्सव

### उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडकाचा भव्य उद्‌घाटन सोहळा!

### दि. २ ते १० फेब्रुवारीदरम्यान चंपवातीच्या रंगमंचावर हजारो बालकलाकारांचे कलाविष्कार!

**बीड । प्रतिनिधी**

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकलेचा अनोखा महाकुंभ बनलेला चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रात मानबिंदू ठरला असून बालकलाकारांच्या या कला सोहळ्याचा उदघाटन समारंभ शिवसेनेचे महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब आणि त्यांच्या कन्या हर्षदाताई शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. दि. २ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सलग चौथ्या वर्षी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलेचा भव्य महासोहळा साजरा होत आहे. काल दि. २७ जानेवारी २०२६ रोजी शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप



यांनी छत्रपती संभाजीनगर येथे मंत्री मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन बाल कलाकारांच्या या महोत्सवाचे अधिकृत आमंत्रण दिले. यावेळी मंत्री शिरसाट साहेब यांनी 'मी नक्की येणार...' असे आश्वासन देत या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अनिलदादा जगताप फाउंडेशन बीड आणि शिवसेना बीड आयोजित हा महोत्सव बालकलाकारांच्या कलागुणांना व्यासपीठ देणारा ठरणार आहे. दि. ४ फेब्रुवारी २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे चंपावती महोत्सवाचा भव्य उद्घाटन सोहळा पार पडणार असून, ▶▶ उर्वरित पान २ वर

## 'बायको नांदत नाही, पोलिसांनी माझा संसार बसवून द्यावा'

### तरुण जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर चढला अन्...; प्रजासत्ताक दिनी पोलिसांची धावपळ

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण देश प्रजासत्ताक दिनाचा उत्साह साजरा झाला. अशात बीड जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात एक अजब प्रकार उघडकीस आला. इथं एका तरुणाने थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर चढून आंदोलन केलं आहे. त्याने इमारतीवरून उडी घेऊन आत्महत्येची धमकी दिल्याने प्रशासनाची मोठी तारांबळ उडाली. माझी पत्नी नांदत नाही, पोलिसांनी माझा संसार बसवून द्यावा, अशी मागणी करत नितीन



उबाळे नावाच्या तरुणाने हा प्रकार केला. त्याच्या 'शोले' स्टाईल आंदोलनामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

नितीन उबाळे हा तरुण गेल्या अनेक दिवसांपासून कौटुंबीक समस्येमुळे त्रस्त आहे. त्याची पत्नी त्याच्यासोबत राहत नसून ती नांदायला तयार नसल्याचे त्याचे म्हणणे आहे. आपला संसार पुन्हा सुरळीत व्हावा, यासाठी तो वारंवार प्रशासनाकडे आणि पोलिसांकडे साकडे घालत आहे. मात्र, मागणी मान्य होत नसल्याने त्याने थेट जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत गाठली आणि टोकाचा निर्णय घेतला. धक्कादायक बाब म्हणजे नितीनने आत्महत्येचा प्रयत्न करण्याची ही पहिली वेळ नाही. पत्नी नांदत नसल्याच्या कारणावरून यापूर्वी त्याने पाच वेळा वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या पद्धतीने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. पण प्रत्येक वेळी पोलिसांनी वेळीच मध्यस्थी करून त्याला वाचवले होते. मात्र, ▶▶ उर्वरित पान २ वर

## दुबईत गल्फ फूड प्रदर्शन; खा.बजरंग सोनवणे यांचा सहभाग

### भारतीय कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगाला मिळणार नवी दिशा

**बीड । प्रतिनिधी**

दुबई येथे सध्या सुरू असलेले जगप्रसिद्ध गल्फ फूड प्रदर्शन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील अन्नप्रक्रिया व कृषी क्षेत्रातील सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ मानले जाते. या भव्य प्रदर्शनात जगभरातील अन्नप्रक्रिया उद्योग, कृषी-उत्पादक कंपन्या, निर्यातदार, व्यापारी तसेच उद्योजक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. खासदार बजरंग सोनवणे हे सध्या या प्रदर्शनात उपस्थित असून त्यांनी या प्रदर्शनाचे भारतीय कृषी क्षेत्रासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले आहे. गल्फ फूड प्रदर्शनामुळे भारतीय कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगाला जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क साधण्याची मोठी संधी




मिळत आहे. भारतीय उत्पादक, शेतकरी गट, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांसाठी हे प्रदर्शन एक प्रभावी मंच ठरत असून, यामुळे भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचण्यास मदत होत आहे. परिणामी निर्यात वाढीस चालना मिळून शेतकरी व उद्योजकांच्या उत्पन्नात वाढ होण्याचा मार्ग मोकळा होत आहे. याबाबत खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हटले की, बीड जिल्ह्यासारख्या ग्रामीण भागात कृषीआधारित व अन्नप्रक्रिया उद्योग उभारण्यासाठी अशा आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांचे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरते. आधुनिक तंत्रज्ञान, जागतिक दर्जाचे पॅकेजिंग, विपणन पद्धती आणि निर्यातीच्या संधी यांची माहिती या ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाई : वनक्षेत्रात ग्रास लँड सफारी प्रकल्पाची सुरुवात



**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई लगतच्या वनक्षेत्रात ग्रास लँड सफारी प्रकल्पाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. भाजपा आमदार नमिता मुंदडाव नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या या उपक्रमाचे उद्धाटन श्री.विवेक जॉन्सन (जिल्हाधिकारी, बीड) यांच्या हस्ते संपन्न झाले. सध्या प्राथमिक अवस्थेत असलेला हा प्रकल्प भविष्यात अंबाजोगाईच्या पर्यटन विकासाला नवी दिशा देईल, असा विश्वास आहे. असे आमदार मुंदडा यांनी सांगितले.या उपक्रमांतर्गत आज अंबाजोगाईच्या वनक्षेत्रात ३३ काळवीटांचे सुरक्षित पुनर्वसन करण्यात आले, ही बाब पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरण संरक्षण, जैवविविधता संवर्धन आणि पर्यटन विकास या तिन्ही उद्दिष्टांना साधणारा हा प्रकल्प यशस्वी होईल असा ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड न.प. सभापती निवडीत राष्ट्रवादीचे वर्चस्व

### आ. विजयसिंह पंडित यांच्याकडून सर्वांना समान संधीचा फॉर्म्युला

**उपाध्यक्ष विनोद मुळूक यांच्याकडे पाणीपुरवठा, बांधकाम संजय उडान, स्वच्छता शेख निजाम, नियोजन बाळासाहेब गुंजाळ, महिला व बालकल्याण आरती बनसोडे, शिक्षण व विद्युत सिमा जकी सौदागर तर स्थायी समितीवर अमर नाईकवाडे**



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेच्या सभापतीपदाची निवडणुक बिनविरोध पार पडली. शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीकडून उपाध्यक्ष विनोद मुळूक यांना पाणीपुरवठा, बांधकाम सभापतीपदी संजय उडान, स्वच्छता सभापतीपदी शेख निजाम, नियोजन सभापतीपदी बाळासाहेब गुंजाळ, महिला व बालकल्याण सभापतीपदी आरती बनसोडे, उपसभापती पदी शेख शबनम बिलाल, शिक्षण व विद्युत सभापतीपदी मोमीन सिमा जकी सौदागर तर स्थायी समितीवर अमर नाईकवाडे ▶ उर्वरित पान २ वर

### शिवसेनेला बांधकाम सभापती पदाची संधी

**बीड नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोबत शिवसेना व शिवसंग्राम यांनी युती करून ही निवडणुक लढविली होती. शिवसेनेच्या तीन नगरसेवकांनी शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीची नोंदणी करताना बिनशर्त पाठिंबा दिला होता. त्यावेळी आ. विजयसिंह पंडित यांनी शिवसेनेचा यथोचित सन्मान होईल असा शब्द दिला होता. दिलेल्या शब्दाप्रमाणे आ. विजयसिंह पंडित यांनी शिवसेनेच्या संजय उडान यांना बांधकाम समितीच्या सभापतीपदी काम करण्याची संधी दिली. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप आणि स्वप्निल गलधर यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी या निवडीबाबत समाधान व्यक्त केले आहे.**

## ऊसतोड मजुरावर काळाचा घाला ; भरधाव वाहनाने चिरडले ; पाळीव कुत्र्यासह जागीच मृत्यू

**कडा । प्रतिनिधी**



पोटाची खळगी भरण्यासाठी ऊसतोडीला गेलेल्या एका कष्टकरी मजुरावर काळाने अचानक घाला घातल्याची हृदयद्रावक घटना करमाळा बायपासवर घडली. आष्टी तालुक्यातील आंबेवाडी येथील बाळासाहेब नवनाथ नरवडे (वय ३५) यांचा भरधाव वाहनाच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला.विशेष म्हणजे, त्याच्यासोबत असलेला पाळीव कुत्राही या अपघातात ठार झाला. या घटनेने परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. बाळासाहेब नरवडे हे अनगर येथील साखर कारखान्यावर ऊसतोड मजूर म्हणून काम करत होते. सोमवारी (दि.२६) ▶▶उर्वरित पान २ वर



# भारतीय संविधान, सद्यस्थिती आणि आपण

२६ जानेवारी हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनातील अत्यंत गौरवशाली, अर्थपूर्ण आणि आत्मपरीक्षणाची संधी देणारा दिवस आहे. १९५० साली याच दिवशी भारतीय संविधान अंमलात आले आणि भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून औपचारिकरीत्या अस्तित्वात आला. ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने आपण केवळ ध्वजारोहण, संचलन, भाषणे आणि औपचारिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता संविधानाचा आत्मा, आजची सामाजिकराजकीयआर्थिक सद्यस्थिती आणि या सगळ्या प्रक्रियेत 'आपण' म्हणजे सामान्य नागरिक म्हणून आपली भूमिका व जबाबदारी यांचा सखोल विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन हा उत्सवाइतकाच तो अंतर्मुख होण्याचा, प्रश्न विचारण्याचा आणि नव्या संकल्पांची बांधिलकी स्वीकारण्याचा दिवस आहे. भारतीय संविधानाचा जन्म हा अचानक घडलेला ऐतिहासिक योगायोग नव्हता. त्यामागे शेकडो वर्षांचा सामाजिक अन्याय, आर्थिक शोषण, जातीय विषमता, स्त्रीपुरुष असमानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या लढ्याचा दीर्घ इतिहास दडलेला आहे. ब्रिटिश राजवटीखाली भारत केवळ राजकीयदृष्ट्या गुलाम नव्हता, तर सामाजिकदृष्ट्याही तो अंतर्गत विसंगतींनी, रूढीपरंपरांच्या जोखडाने आणि दारिद्र्याने ग्रासलेला होता. स्वातंत्र्यलढा हा केवळ सत्ता हस्तांतराचा संघर्ष नव्हता, तर तो माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवण्याचा व्यापक लढा होता. महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा आणि नैतिकतेच्या बळावर या लढ्याला दिशा दिली, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेला संविधानिक अधिष्ठान दिले.

संविधान सभेने जवळपास तीन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चाललेल्या सखोल चर्चांमधून भारतीय संविधानाची निर्मिती केली. जगातील विविध लोकशाही देशांच्या राज्यघटनांचा अभ्यास करून, भारतीय समाजाच्या बहुविध वास्तवाचा विचार करून हे संविधान घडवण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीने तयार केलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नसून भारतीय समाजाच्या आशाआकांक्षा, संघर्ष, वेदना आणि स्वप्नांचा जिवंत दस्तऐवज आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही संविधानाची चार मूलभूत मूल्ये आजही भारतीय प्रजासत्ताकाचा आत्मा आणि दिशा ठरवणारी शक्ती आहेत.

प्रजासत्ताक ही संकल्पना केवळ राष्ट्रप्रमुख निवडणुकीद्वारे निवडला जातो इतक्यापुरती मर्यादित नाही. प्रजासत्ताक म्हणजे सत्ता एखाद्या व्यक्तीकडे किंवा राजघराण्याकडे न राहता लोकांकडे असणे, कायद्यापुढे सर्व समान असणे आणि निर्णयप्रक्रियेत जनतेचा सक्रिय सहभाग असणे. भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देऊन प्रत्येक नागरिकाला समान राजकीय अधिकार दिला. शिक्षण, संपत्ती, जात, धर्म किंवा लिंग यांचा विचार न करता मतदानाचा हक्क देणे ही लोकशाहीच्या इतिहासातील क्रांतिकारी पायाभरणी होती. मात्र लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सजग, चिकित्सक आणि जबाबदार नागरिकत्वात रूपांतरित होणे आवश्यक आहे. संविधानाने दिलेले मूलभूत हक्क हे भारतीय नागरिकांचे संरक्षणकवच आहेत. समानतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, शिक्षणाचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क आणि घटनात्मक उपायांचा हक्क हे अधिकार नागरिकांना सन्मानाने जगण्याची हमी देतात. परंतु आजच्या सद्यस्थितीत या हक्कांचा वापर करताना अनेकदा त्यांचा गैरवापर, संकुचित अर्थ लावणे किंवा राजकीय हेतूंसाठी विकृतीकरण होत असल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून विवेकाने व्यक्त होण्याची क्षमता होय, हे आपण पुन्हापुन्हा लक्षात घेतले पाहिजे.

आजची आर्थिक आणि सामाजिक सद्यस्थिती पाहिली असता भारत प्रगतीच्या मार्गावर वेगाने पुढे जात असतानाच अनेक अंतर्विरोधांना सामोरे जात आहे. पायाभूत सुविधा, औद्योगिक विकास, डिजिटल तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील वाढती भूमिका यांमुळे भारताची आंतरराष्ट्रीय ओळख अधिक ठळक होत आहे. मात्र या प्रगतीसोबत आर्थिक विषमता वाढताना दिसते. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी रुंदावत चालली असून मध्यमवर्गीयांचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. बेरोजगारी, महागाई, शेतकरी संकट, असंघटित कामगारांचे प्रश्न हे आजही गंभीर स्वरूप धारण करून समाजासमोर उभे आहेत.

ग्रामीण आणि शहरी भारतातील असमतोल विकास ही आजची मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो, तर शहरी भागात स्पर्धा, असुरक्षितता, ताणतणाव आणि सामाजिक दुरावा वाढताना दिसतो. स्थलांतरामुळे झोपडपट्ट्यांची वाढ, पर्यावरणीय ताण आणि सामाजिक विस्कळीतपणा निर्माण होत आहे. संविधानाने सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक मर्यादा आणि अडथळे दिसून येतात.

सामाजिक पातळीवर जातीय तणाव, धार्मिक ध्रुवीकरण, असहिष्णुता आणि द्वेषमूलक प्रवृत्ती वाढताना दिसतात. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेची हमी दिली असली तरी सामाजिक वास्तवात अजूनही भेदभाव, अन्याय आणि शोषण पूर्णपणे संपलेले नाही. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक आणि इतर वंचित घटकांना अजूनही हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक असमानता या समस्या प्रजासत्ताकाच्या आरोग्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

राजकीय सद्यस्थितीचा विचार करता लोकशाही प्रक्रियेत झालेले बदल प्रकर्षाने जाणवतात. निवडणुका नियमितपणे होत असल्या तरी राजकारणात पैसा, प्रचारयंत्रणा, सोशल मीडिया आणि भावनिक मुद्द्यांचे वाढते वर्चस्व चिंताजनक ठरत आहे. संसदीय चर्चा, धोरणात्मक पारदर्शकता आणि लोकप्रतिनिधींचे उत्तरदायित्व या बाबी दुर्लक्षित होत असल्याची भावना निर्माण होते. लोकशाही केवळ सत्तांतराची प्रक्रिया नसून ती सतत जागरूक राहण्याची, प्रश्न विचारण्याची आणि संवाद साधण्याची व्यवस्था आहे, हे आपण विसरता कामा नये.

शिक्षण व्यवस्था ही संविधान आणि सद्यस्थिती यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे. सुशिक्षित, विवेकी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. मात्र आज शिक्षण अधिकाधिक बाजाराभिमुख, स्पर्धात्मक आणि गुणकेंद्रित होत चालले आहे. संविधानिक मूल्ये, सामाजिक बांधिलकी, नैतिकता आणि मानवी संवेदना यांचे शिक्षण दुय्यम ठरत आहे. युवकांमध्ये लोकशाहीची जाणीव, संविधानाची ओळख आणि सामाजिक जबाबदारी रुजवणे ही काळाची गरज आहे.

डिजिटल युगातील भारत ही आजची एक महत्त्वाची सद्यस्थिती आहे. तंत्रज्ञानामुळे शासन अधिक पारदर्शक झाले, सेवा सुलभ झाल्या आणि माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली. मात्र त्याचवेळी खोटी माहिती, अफवा, द्वेषमूलक भाष

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# शरद पवारांची पॉवर कायम आहे का?

गेली पाच दशकांहून अधिक काळ शरद पवार या नावाभोवती महाराष्ट्राचे राजकारण फिरते आहे.बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे यांनी महाराष्ट्राचा गाडा हाकला.कॉंग्रेसची राज्यात पिछेहाट होते आहे.

शरद पवारांनी एकहाती राजकारण केले.कै.वसंतदादा पाटील यांना शह देवून राज्याच्या सर्वोच्चपदी विराजमान झाले (१९७८). पूढे त्यांनी मागे वळून पाहिले नाही.१९७२च्या दुष्काळातील बल्डींगमाफी असो की ९३चा लातूर जिल्ह्यातील किल्लारीचा भूकंप.पिडीतांच्या पाठीसी खंबिरपणे कायम उभे राहिले.राज्याच्या उद्योग जगतात कायम योगदान राहिले.शेती सिंचनाच्या प्रश्नावर काम केले.मराठवाडा

विद्यापीठाच्या संबंधित आंदोलन असो की कामगार चळवळी कोणत्याही प्रश्नांवर दुर्लक्ष केले नाही.

शरद पवार एकून चार वेळा

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिले.संरक्षणमंत्री, कृषीमंत्री. कृषीमंत्रीपदाच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली होती.

शरद पवारांनी कॉंग्रेसशी फारकत घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेसची १९९९मध्ये स्थापना केली.छगन भुजबळ, बबनराव पाचपुते,आर आर पाटील, फौजिया खान,विमल मुंदडा, विनायक मेटे यांची साथ मिळाली.राष्ट्रवादी स्थापनेनंतर सहा महिन्यांत राज्याच्या सत्तेत आला.

विलासराव देशमुखांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन झाले. छगन भुजबळ उपमुख्यमंत्रीपदी.पुढे२००४ला सत्ता मिळाली.आर आर पाटील, विजयदादा उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचले.पवारसाहेबांना कर्करोगाशी झुंजावे लागले.त्यांनी त्यावर लिलया मात केली.आर आर पाटील,विमल मुंदडा, विनायक मेटे निघून गेले तरी पक्ष सावरला.

२०१४साली सत्ता हातून गेली भाजप शिवसेना सत्तेवर आला.पवारांनी या सरकारला समर्थन दिले विकासकामे करत राहिले.२०१९ला पुन्हा सत्ता मिळवली .उद्धव बाळासाहेब ठाकरेंना मुख्यमंत्री करुन महाराष्ट्राचा विकास करत असतांना भाजपने खोडा घालून सत्ता हिसकावली.आता अजितदादा आणि शरद पवार एकत्र आले आहेत.महाराष्ट्राला राजकीय स्थैर्य प्राप्त होवून विकास होईल अशी आशा बाळगुया!



**– नामदेव लोंढे (८६६९८२६०५८)**

◆ पान १ वरून पुढे...

## आईकडून 11 वर्षांच्या...

सोनीने १३ वर्षीय मुलगी धनश्री हिच्यावर चाकूने वार केले. या घटनेत ती गंभीर जखमी झाली आहे. 'सोनी जायभाय मूळची नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील रहिवासी आहे. जायभाय कुटुंबीय सध्या वाघोलीतील बायफ रस्त्यावर राहायला आहे. सोनीने हे कृत्य का केले, याची निश्चित माहिती समजली नाही. त्यादृष्टीने तपास सुरू आहे. चौकशीत खूनामागचे निश्चित कारण समजेल', अशी माहिती वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज हांडे यांनी दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. गंभीर जखमी झालेला साईराज आणि त्याची बहीण धनश्री यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच साईराज याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सोनी जायभायने ११ वर्षाच्या मुलाचा खून करुन मुलीवर चाकूने वार केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात शोककळा पसरली. पोलीस निरीक्षक हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## मंत्री संजय...

मंत्री संजयजी शिरसाट साहेबांच्या मार्गदर्शनामुळे बालकलाकारांचा आत्मविश्वास अधिक बळकट होणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. या प्रसंगी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल भाऊ अनभुले, सुदर्शन धांडे आणि प्रतिक कांबळे यांची उपस्थिती होती. संपूर्ण जिल्ह्याच्या कलाक्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरणारा हा महोत्सव बीडच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा ठरणार आहे.

## 'बायको नांदत...

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून त्याने सहाव्यांदा अशाप्रकारे टोकाचं

◆ पान १ वरून पुढे...

पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. तुला न्याय मिळवून देऊ, तुझ्या पत्नीशी चर्चा करू, पण तू खाली उतर, अशी विनवणी पोलिसांकडून केली जात आहे. मात्र, नितीन आपल्या मागणीवर ठाम असल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेने बीडमध्ये चर्चेला उधाण आलं आहे.

## दुबईत गल्फ...

प्रदर्शनातून मिळत असल्याने ग्रामीण भागातील युवक-उद्योजकांना नवे उद्योग सुरू करण्याची प्रेरणा मिळते. ग्रामीण भागात अन्नप्रक्रिया उद्योग सुरू झाल्यास स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल, शेतमालाला योग्य भाव मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त होईल. तसेच युवकांना स्वावलंबी बनण्याची संधी मिळून स्थलांतरालाही आळा बसेल, असेही म्हटले आहे.या प्रदर्शनातून मिळणारा अनुभव, संपर्क आणि माहिती निश्चितच ग्रामीण उद्योगविकासासह देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी मोलाची ठरणार असल्याचा विश्वास खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.

## अंबाजोगाई : वनक्षेत्रात...

विश्वास आहे.या प्रसंगी श्री.गरकळ (विभागीय वन अधिकारी), श्री लखमावाड, श्री.दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी), श्री. विलास तरंगे (तहसीलदार), श्री.पुंड साहेब (ठत्रज), श्री.अनिकेत लोहिया (सामाजिक कार्यकर्ते), श्री.अभिजीत लोहिया यांच्यासह वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड न.प. ...

यांना संधी देण्यात आली. आ. विजयसिंह पंडित यांनी या निवडणुकीत

◆ पान १ वरून पुढे...

सर्वांना समान संधीचा फॉर्म्युला आणून प्रत्येक समितीमध्ये जास्तीत जास्त सदस्यांना काम करण्याची संधी मिळेल अशा पध्दतीने समित्यांची रचना केली आहे. सभापती पदाच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. शिवछत्र कार्यालयात नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या, यावेळी कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. बीड नगर परिषदेच्या विषय समित्यांची निवडणुक प्रक्रिया मंगळवार, दि. २७ रोजी संपन्न झाली. पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी काम पाहिले. विषय समित्यांची सदस्य संख्या १४ करण्याचा ठराव करून उपाध्यक्षांना पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीचे पदसिध्द सभापती म्हणून निवड करण्याचा निर्णय पहिल्या बैठकीत करण्यात आला. विषय समित्यांवर नगर परिषद सदस्यांचे नामनिर्देशन झाल्यानंतर समितीच्या सभापती पदासाठी निवडणुक प्रक्रिया पार पडली. विहित मुदतीत केवळ शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीकडून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले, त्यामुळे ही निवडणुक प्रक्रिया बिनविरोध संपन्न झाली. आघाडीचे गटनेते फारुक पटेल यांनी प्रत्येक विषय समितीसाठी सात सदस्यांच्या नावांची शिफारस पिठासीन अधिकारी यांच्याकडे केली. स्थायी समितीसाठी ज्येष्ठ व अनुभवी नगरसेवक अमर नाईकवाडे यांच्या नावाची शिफारस करण्यात आली.

शिव-शाहू-फुले-आंबेडकर-मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीच्यावतीने सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी संजय उडान, स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीच्या सभापतीपदी शेख निजाम, नियोजन व विकास समितीच्या सभापतीपदी धर्मराज उर्फ बाळासाहेब गुंजाळ, शिक्षण, विद्युत, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी मोमीन सीमा परवीन अब्दुल रशिद उर्फ सीमा जकी सौदागर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी आरती रंजित बनसोडे,

◆ पान १ वरून पुढे...

उपसभापती पदी शेख शबनम बिलाल यांना संधी देण्यात आली आहे. नवनिर्वाचित सभापतींचा 'शिवछत्र' येथे यथोचित सन्मान करून त्यांना भविष्यकालीन वाटचालीसाठी आ. विजयसिंह पंडित यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी नगर परिषद निवडणुकीचे निरीक्षक तथा माजी आमदार संजय दौंड, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप, स्वप्निल गलधर, राष्ट्रवादीचे माध्यम प्रमुख भागवत तावरे, बीड बाजार समितीचे उपसभापती शामराव पडुळे, नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, गटनेते फारुक पटेल, दै.सिटीझनचे संपादक शेख मुजीबभाई यांच्यासह आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

## ऊसतोड मजुरावर...

कामानिमित्त ते आपल्या पाळीव कुत्र्यासह दुचाकीवरून आंबेवाडीकडे निघाले होते. दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास करमाळा बायपासवरून जात असताना अचानक त्यांच्या दुचाकीचा तोल गेला आणि ते रस्त्यावर कोसळले.याच क्षणी पाठीमागून आलेल्या एका भरधाव वाहनाने त्यांना चिरडले.अपघात इतका भीषण होता की, बाळासाहेब आणि त्यांचा पाळीव श्वान दोघांचाही जागीच मृत्यू झाला. बाळासाहेब यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील,पत्नी आणि तीन चिमुकल्या मुली असा मोठा परिवार आहे. घरचा एकमेव कमावता हात गेल्याने नरवडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सोमवारी रात्री उशिरा अत्यंत शोकाकुल वातावरणात आंबेवाडी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. भारताचा प्रजासत्ताक दिनाचा आनंद साजरा होत असतानाच घडलेल्या या दुर्दैवी घटनेने संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून कष्टकऱ्याचा जीव इतका स्वस्त का? असा संतप्त सवाल नागरिकांतून व्यक्त होत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## भगवान गडाच्या...

सुमंत खेडकर, अॅड. चंपावती पानसंबळ, माऊली पानसंबळ, रामनाथ खेडकर, जगन्नाथ कदम,भुजंग कदम, विशाल खेडकर,सुनील लाटे, सुभाष लाटे, रावसाहेब धामणे,हरिचंद्र धामणे, दिलीप पानसंबळ, पांडुरंग खेडकर, सखाराम खेडकर, संतोष खेडकर,गायकवाड, परमेश्वर गिऱ्हे, शेळके, मंचारे गेंदळे, नाना केदार, केकान पत्रकार विजयकुमार गाडेकर, भारतकुमार पानसंबळ, गोकुळ पवार, सतीश मुरकुटे, मनोज परदेशी यांच्यासह ग्रामस्थ महिला व पंचक्रोशीतील सामाजिक राजकीय अधिकारी अधिकारी पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री बळीराजा शेत...

शेत / पाणंद रस्ते योजना अंतर्गत बीड जिल्ह्यातील एकूण ५६ पाणंद रस्ता, गाव रस्ता, शिव रस्ता खुला करून सिमांकन करून देण्यात आलेले आहे. तसेच सदर ग्रामपंचायत यांना सदर रस्त्याचे मजबूती करण करण्यासाठी ग्रामसभेमधे ठराव घेऊन प्रस्ताव तालुकास्तरावर विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती मार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्या बाबत सूचना दिलेल्या आहेत. मा. जिल्हाधिकारी बीड यांचे कडून सर्व शासकीय कंत्राटदार आय यंत्र मालक अवगत करण्यात येते की, शासनाकडून दि. २८/०१/२०२६ रोजी सदर योजणेकरिता निविदा प्रसिद्ध करण्यात येणार असून यामध्ये जास्तीतजास्त कंत्राटदारांनी व यंत्र मालकानी सहभाग नोंदवून निविदा भरावी असे आवाहन जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींना जि. बीड आपल्या गावातील रस्ते, शेत रस्ते, पाणंद रस्ते अतिक्रमीत असतील तर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी तहसीलदार यांचे कडे संपर्क करावा व अतिक्रमण मुक्त सिमांकन झालेले रस्ते चा प्रस्ताव मान्यतेसाठी विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीकडे सादर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## तीन अपत्य...

मतदार विशाल चांगदेव ससाणे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या अपीलद्वारे केली आहे. या प्रकरणामुळे माजलगाव तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अपीलमध्ये नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत सरपंच सार्वत्रिक निवडणूक २०२३ दरम्यान संगिता येताळ यांनी महिला राखीव जागेतून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. नामनिर्देशनपत्र भरताना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमांनुसार संपूर्ण व खरी माहिती देणे बंधनकारक असताना, त्यांनी केवळ

◆ पान ४ वरून पुढे...

दोन अपत्य असल्याचे स्वयंघोषणापत्र सादर केले. मात्र प्रत्यक्षात त्यांना तीन अपत्ये असून ही बाब जाणीवपूर्वक निवडणूक अधिकाऱ्यांपासून लपवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अपीलार्थी विशाल ससाणे यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार, संगिता येताळ यांचे पहिले अपत्य अंजना हरिभाऊ येताळ असून तिची जन्मतारीख २० ऑक्टोबर १९९७ अशी शालेय प्रवेश निर्गम उताऱ्यावर नमूद आहे. दुसरे अपत्य वैजनाथ हरिभाऊ येताळ याची जन्मतारीख ९ मार्च २००१ असून, संबंधित शाळांचे अभिलेख उपलब्ध आहेत. याशिवाय तिसरे अपत्य असल्याचे पुरावेही सादर करण्यात आले असून, या सर्व बाबी नामनिर्देशनपत्रात नमूद न केल्याचा गंभीर आरोप अपीलमध्ये करण्यात आला आहे. या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांच्या न्यायालयात दिनांक १६ ऑक्टोबर २०२५, ३० ऑक्टोबर २०२५ तसेच ७ ऑगस्ट २०२५ रोजी सुनावण्या ठेवण्यात आल्या आहेत. उपजिल्हाधिकारी व नायब तहसिलदार यांच्या स्वाक्षरीने संबंधित पक्षांना नोटिसा बजावून कागदपत्रांसह हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अपीलार्थी विशाल ससाणे यांनी मागणी केली आहे की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम १४ (ज-१) नुसार तीन अपत्य असलेली व्यक्ती ग्रामपंचायत सदस्य अथवा सरपंच पदासाठी अपात्र ठरते. त्यामुळे संगिता येताळ यांचे सरपंच पद तात्काळ रद्द करण्यात यावे. तसेच निवडणूक प्रक्रियेत खोटी माहिती देऊन शासन व जनतेची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात कायद्याच्या चौकटीत लढा देत विशाल ससाणे यांनी पारदर्शकतेची भूमिका घेतल्याचे ग्रामस्थांमधून बोलले जात असून, जिल्हाधिकारी न्यायालयाच्या निकालाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आतिक्रमण ऊठवण्या...

तडजोडीतुन हे प्रकरण पेंडिंग ठेवल्याची चर्चा होत आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे मागील निवेदने व नोटीसचे आणुकरण करत स्मरण पत्र व निवेदना व्दारे इशारा दिला होता. संबंधित प्रशासनाने २६ जानेवारी पूर्वी तिसरी नोटीस देऊन अतिक्रमण ऊठवने क्रमप्रत आसतांना तसे न केल्या मुळे दिलेल्या निवेदना नुसार दिनांक २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी ठरलेल्या वेळेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिका-यांनी हजारो गावकऱ्यांसमक्ष गाव तलावात जलसमाधी

◆ पान ४ वरून पुढे...

आंदोलनास सुरवात केली होती. प्रजासत्ताक दिनी काही अनुचित प्रकार घडु नये यासाठी तलवाडा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष सपोनी निलंगेकर साहेब यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक अन्नलदास साहेब, काकडे साहेब, गरदे साहेब तसेच महिला पोलीस कर्मचारी यांनी जलसमाधी आंदोलन स्थळी चोक कर्तव्यदक्षता बजावत या आंदोलनास मोलाचे सहकार्य केले. तत्पूर्वी गेवराई पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ऊनवणे साहेब, तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी श्री सोपान मुसळे साहेब, राठोड साहेब, प्रशासक चोपडे दादा यांनी आंदोलन स्थळी तातडीने धाव घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी आपले जलसमाधी आंदोलन तुर्तास मागे घेऊन प्रशासनास सहकार्य करावे आशी विनंती केली मात्र आंदोलक ठाम आसल्याने हजारो गावकऱ्यांसमक्ष संबंधित अधिका-यांनी १ महिण्याच्या आत पूर्वीच्या दोन नोटीसीस आणुसरुन तीसरी नोटीस आतिक्रमण धारकांना देऊन अतिक्रमण जमिन दोस्त करण्यात येईल आसे लेखी दिल्याने जलसमाधी आंदोलन एक महिन्यापुर्ते मागे नव्हे तर स्थगित करत असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी संबंधीत आधिका-यांना बजावत तुर्तास जलसमाधी आंदोलन स्थगित केल्याचे प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधिंना सांगितले आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा...

मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत केज तालुक्यातील टाकळी येथे केज-टाकळी शिव रस्त्याच्या अतिक्रमण हटवून रस्ता मजबुतीकरण कामकाजास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. हा शिव रस्ता सुमारे ३ किलोमीटर लांबीचा असून चिंचोली माळी येथील राज्यमार्ग ते टाकळी येथील राष्ट्रीय महामार्ग यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे अरुंद झालेल्या या रस्त्यावरून शेतीमाल वाहतूक करताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अतिक्रमण हटवून ३३ फूट रुंदीने रस्ता मजबुतीकरणास सुरुवात करण्यात आल्याने सुमारे २५०० शेतकऱ्यांना थेट लाभ होणार आहे. शेतीमाल वाहतूक , मशागत , बाजारपेठेपर्यंत पोहोच तसेच आपत्कालीन सेवा अधिक सुलभ होणार आहेत. या वेळी उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे , अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे , मंडळ अधिकारी तसेच विविध महसूल विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व लगत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन रस्ता होत असल्याने ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी , उपविभागीय अधिकारी आणि संपूर्ण महसूल प्रशासनाचे

◆ पान ४ वरून पुढे...

आभार मानले.     राजुरी ( न ) मंडळातील मुर्शदपूर - तिप्पटवाडी येथे अतिक्रमणमुक्त पाणंद रस्ता खुला - याच दिवशी मंडळ विभाग राजुरी ( न ) , तालुका व जिल्हा बीड अंतर्गत मुर्शदपूर आणि तिप्पटवाडी येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत आणखी एक महत्त्वपूर्ण कार्यवाही यशस्वीपणे पार पडली. अर्जदार अजिनाथ रोडे आणि इतर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार गट क्रमांक १५१ , ७५ आणि ७७ मधील वंजारवाडी तलावाच्या कॅनॉललगतचा चारी रस्ता हा अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे पूर्णपणे बंद अवस्थेत होता. या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेतीपर्यंत पोहोचताना मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. या प्रकरणात मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्राम महसूल अधिकारी नवनाथ तांदळे आणि प्रविण सानप यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून अर्जदार व गैर-अर्जदार यांच्याशी सखोल संवाद साधला. उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाचे उप अधीक्षक शिवनकर तसेच भूकर मापक संजय जायभाये आणि गणेश थिगळे यांच्या उपस्थितीत सर्व संबंधित पक्षांमध्ये आपसी समेट घडवून आणण्यात आला. या कार्यवाहीदरम्यान उपविभागीय अधिकारी कविता जाधव आणि तहसीलदार चंद्रकांत शेळके हे प्रत्यक्ष उपस्थित होते. रस्ता खुला करताना अर्जदार अजिनाथ रोडे , कल्याण रोडे , गणेश रोडे , हनुमान रोडे , अशोक रोडे , दिपक रोडे , सुनील जगताप तसेच गैर-अर्जदार कचरू वखरे , भास्कर वखरे , भीमराव ढास आणि इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत तिप्पटवाडीचे सरपंच विष्णु प्रल्हाद जाधव , मुर्शदपूर ग्रामपंचायतीचे सरपंच कुमार कचरू वखरे , माजी सरपंच अनिल जावळे तसेच प्रतिष्ठित नागरिक सुनील जगताप , गणेश जावळे , भास्कर वखरे आदींनी सक्रिय सहभाग घेत शासनास सहकार्य केले. सुमारे १ ते १.५ किलोमीटर अंतराचा हा पाणंद रस्ता खुला झाल्याने परिसरातील अनेक शेतकऱ्यांचा दीर्घकालीन प्रश्न मार्गी लागला असून , शेतीपूरक वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. प्रशासन , लोकसहभाग आणि संवेदनशील निर्णयांचा समन्वय - मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना केवळ रस्ते उघडण्यापुरती मर्यादित न राहता , ग्रामीण विकासाला गती देणारी आणि शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणारी योजना ठरत आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामस्थ यांच्यातील समन्वयातून ही कार्यवाही पार पडत आहे. एकाच दिवशी जिल्हाभरात ५६ पानंद रस्ते खुले होणे हे बीड जिल्ह्यासाठी मैलाचा दगड ठरणार असून , आगामी काळात ग्रामीण भागातील दळणवळण , शेती आणि अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल , असा विश्वास प्रशासन आणि शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीडच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील



## दिमाखदार सोहळ्यात पार पडला प्रजासत्ताक दिन

**बीड । प्रतिनिधी**

शासन बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे या पुढील काळात विकासाची ही गंगा वाहती रहावी यासाठी भगीरथ प्रयत्न सुरू आहेत. त्याला नागरिकांनी देखील साथ द्यावी असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री श्री. बाबासाहेब पाटील यांनी आज येथे केले. त्यांच्या हस्ते ७७ वा प्रजासत्ताक दिनी मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला. पोलीस कवायत मैदानावर झालेल्या या दिमाखदार सोहळ्यात नागरिकांचा सहभाग हे वैशिष्ट्य ठरले. याप्रसंगी आमदार विजयसिंह पंडित, आमदार संदीप क्षीरसागर, नगराध्यक्षा प्रमिला पारवे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनित कॉंवत, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान आदींची प्रमुख उपस्थिती यावेळी होती.

दिमाखदार संचलन तसेच ५००० शालेय विद्यार्थ्यांच्या समुहाने केलेल्या कवायती, लेझीम, प्रात्यक्षिके पोलीस दलाच्या श्वान पथकाने केलेली प्रात्यक्षिके आदींनी हा सोहळा रंगत गेला. यावेळी बोलताना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सर्वप्रथम बीडवासीयांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. ते यावेळी म्हणाले की, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण संविधान स्वीकृत केले. त्या संविधानावर आजवर देश विकासाची वाट चालत आहे. या संविधानाने दिलेली ही सार्वभौम प्रजासत्ताकाची संकल्पना पुढे नेताना प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आपला देश आता जागतिक स्तरावर चौथी मोठी अर्थसत्ता होत आहे.

राज्यात मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे आणि श्री.अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्याला १ ट्रिलियन अर्थव्यवस्था करण्याचे काम जोमाने सुरू आहे. या पुढाकारासाठी मी सर्वांचे आभार या प्रसंगी व्यक्त करतो, असे ते म्हणाले.

भौगोलिकदृष्ट्या राज्याच्या केंद्रस्थानी असणारा आपला हा बीड जिल्हा आगामी काळात विकासाचेही मोठे केंद्र ठरावे यासाठी शासन प्रयत्त करित आहे. पालकमंत्री श्री.अजित पवार यांच्या मार्गदर्शनात जिल्हा वाटचाल करीत आहे. बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न आता पुर्णत्वास आले आहे आणि ही रेल्वे परळी वैजनाथ पर्यंत नेण्याचे काम गतिमान पद्धतीने सुरू आहे असे सांगून ते म्हणाले की अजित पवार यांच्या नियोजनातून येथे विमानतळ उभारणीच्या कामाला देखील गती देण्यात आली आहे. मनुष्यबळ विकासासाठी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या या जिल्ह्यात शेती विकासाकरिता शासनाने प्राधान्य दिले आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ५७५ कोटींचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे आणि त्यापैकी ५३९ कोटी रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली आहे. अशी माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली. जमिनीवर दिसणारा आणि साकारणारा विकास जिल्ह्यात विस्तारत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, प्रशासकीय इमारत तसेच कृषी भवन आदी इमारतींच्या कामातून याची प्रचिती येते. सहकार खात्याचा मंत्री या नात्याने सर्व सहकार विषयक कार्यालये एकाच इमारतीत असावी या भूमिकेतून शहरात मध्यवर्ती भागात १४ कोटी ९८ लक्ष रुपये किमतीच्या मान्यतेसह चार मजली अद्ययावत इमारतीचे भूमीपूजन नववर्षदिनी करण्यात आले आहे.

## शांताई अर्बन संस्थेत ७७ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या वातावरणात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी मध्ये भारताच्या लोकशाही परंपरेचा गौरव करणारा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे मान्यवर पाहुणे डॉ. सुरेश ठोंबरे व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. अलका ठोंबरे मॅडम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देत सामूहिकरित्या राष्ट्रगीताचे गायन केले.



प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून भारतीय संविधान ही केवळ कायद्यांची संहिता नसून देशाच्या एकात्मतेचा, समतेचा व सामाजिक न्यायाचा पाया असल्याचे प्रतिपादन केले. संविधानाने दिलेले हक्क जपतानाच प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्यांची जाणीव ठेवणे हे राष्ट्रउभारणीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांवर उभा असलेला भारत घडवण्यासाठी थोर स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानाची आठवण करून देत त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर प्रमुख अतिथींचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रम राष्ट्रगीत व देशभक्तीच्या जयघोषात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे, उपाध्यक्ष वाघमारे सर, परमेश्वर शिंदे, साईनाथ वाघमारे, नितीन जाधव, शाम राठोड, अमोल मुसळे, शाखा व्यवस्थापक आरती कुलकर्णी, आकाश गाडे, शिवा शिंदे तसेच संचालक मंडळ, सर्व सभासद, पिग्मी एजंट, खातेदार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय संविधानामुळेच देशाची लोकशाही मजबूत ; डॉ. किरण सवासे

### तुलसी शैक्षणिक समूहांमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय संविधानामुळेच आज देशाची लोकशाही व्यवस्था भक्कम पायावर उभी असून विद्यार्थ्यांनी केवळ तांत्रिक शिक्षण घेऊन चालणार नाही, तर त्यासोबत सामाजिक बांधिलकी जपत देशाचे जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन जीवन ज्योत हॉस्पिटलचे डॉ.किरण सवासे यांनी केले.

येथील 'तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या सोहळ्याला संस्था प्रतिनिधी डॉ. प्रियंका रोडे, मा.संतोष लोहिया, मा.सूरज सावंत (बीएसएफ), तसेच तुलसी आय.टी कॉलेजचे प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे,




फॅशन डिझाईन कॉलेजच्या प्राचार्या डॉ. अश्विनी बेद्रे, गुरुकुल कॉलेजचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा.डी. डी. राऊत आणि तुलसी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सवासे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले. यावेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टर प्रेझेंटेशन तसेच देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रमात विशेष रंगत भरली. यानंतर प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित विविध शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



*भारतातील सर्वसामान्य प्रजेच्या हाती सत्ता देणारा आजचा दिवस इतिहासात सोनेरी अक्षरांनी कोरलेला आहे. भारताच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आज छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या मुख्यालयात माझ्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले तसेच सामूहिक राष्ट्रगीतानंतर राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मुशीर अहमद शेख, प्रमुख अधीक्षक श्री. खुसरो खान, प्रशासकीय अधीक्षक श्री. शोएब शमशुद्दीन शेख यांसह वक्फ बोर्डाचे सर्व कक्ष अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.*

## केज येथिल कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बी.एस्सी.नर्सिंग कॉलेजतर्फे आयोजित 'सिपीडी' कार्यक्रम संपन्न

### नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नौकरीच्या अथांग संधी : विजयकांत मुंडे

**केज । प्रतिनिधी**

नर्सिंग क्षेत्राला आजच्या काळात अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.या क्षेत्रात शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सरकारी निमसरकारी, आणि खासगी रुग्णालयांसह, महानगरपालिका, रेल्वे, नर्सिंग स्कूल, महाविद्यालयामध्ये कायमस्वरूपी नौकरीची संधी उपलब्ध असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत मुंडे यांनी केले आहे. रेणुका माता कृषी विकास





प्रतिष्ठान देवगाव संचलित कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बीएससी नर्सिंग कॉलेज केज ता.केज जि.बीड यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय कंटिन्यूअस प्रोफेशनल डेव्हलपमेंट (सीपीडी) कार्यक्रमाच्या उद्घाटना प्रसंगी ते बोलत होते.बीड येथिल यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे रविवारी या कार्यक्रमाचे दिमाखात आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचा शुभारंभ रेणुका माता कृषी विकास प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विजयकांत मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव अतुल मुंडे, डॉ.मुहाम्मद मुजामुले, डॉ.आशिष गरजे,

## लोकशाही पत्रकार संघाच्या सुनंदा केदार, हामेद खान, प्राजक्ता डोंगरे यांच्या निवडी

**बीड । प्रतिनिधी**

येथील कार्यालयात लोकशाही पत्रकार संघाच्या सुनंदा केदार यांची राष्ट्रीय अध्यक्षा उद्योग विकास समिती पदी निवड तर हामेद खान यांची मराठवाडा सचिव पदी निवड तर प्राजक्ता डोंगरे यांची बीड जिल्हा अध्यक्षा उद्योग विकास समिती पदी निवड ही निवड लोकशाही पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष बीबी वैद्य, प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील, बीड जिल्हा संघटक संजय कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात अली.सुनंदा केदार ह्या सामाजिक




कार्यामध्ये सर्वत्र अग्रेसर असलेल्या सर्वांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणाऱ्या कुठलाही महिलांचा प्रश्न असो तात्काळ हातात घेऊन तो सोडवण्यासाठी सातत्याने शासन प्रशासन दरबारी प्रयत्न करून सर्व महिलांना न्याय मिळवून देणाऱ्या अशा पत्रकार संघाच्या लेडी सिंघम म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाराष्ट्र राज्यामध्ये अतिशय उत्कृष्ट महिलांसाठी कार्य केलेल्या अशा लेडी सिंघम सुनंदा केदार मॅडम यांच्या आता डायरेक्ट राष्ट्रीय अध्यक्ष उद्योग विकास समितीवर मा संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य साहेब यांच्या आदेशावरून व प्रदेशाध्यक्ष प्रतापराव साळुंखे पाटील व राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव साहेब, राष्ट्रीय उपाध्यक्ष निलोफर शेख, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब भाई पाठण, प्रदेश उपाध्यक्ष अनिस कुरेशी, वसीम आजाद, सय्यद साजेद, बंडू वैद्य यांच्या सूचनेवरून महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी ही निवड जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्र सादर केले आहे.

## बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे प्रजासत्ताक दिन साजरा



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बी.फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात, गौरवपूर्ण व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरूवात सकाळी ८ वाजता झाली. सर्व मान्यवर, प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.संतोष टरके होते. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. ध्वजारोहणाचा मान संस्थेचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी. आय.खडकभावी यांना देण्यात आला. राष्ट्रगीताच्या गजरात ध्वजारोहण संपन्न होताच संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.खडकभावी यांनी भारतीय संविधानाचे महत्व स्पष्ट करीत संविधानाने दिलेले अधिकार व कर्तव्ये आत्मसात करून राष्ट्र उभारणीत आपण सर्वांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रजासत्ताक दिनाचा ऐतिहासिक व घटनात्मक संदर्भ त्यांनी यावेळी प्रभावीपणे मांडला. ध्वजारोहणानंतर आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतं, कविता, भाषणे व विविध सादरीकरणांतून स्वातंत्र्य, समता, बंधुता व संवैधानिक मूल्यांचा संदेश दिला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.मंदार चौधरी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून आभार मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम देशभक्ती, संवैधानिक मूल्ये व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरला.


दैनिक मराठवाडा पत्र दि. २७/०१/२०२६

**टी.सी. हरवला आहे.**

**रंजना सोपान घरत १२वी पासचा टी.सी. खर्डा ते वाशी प्रवासात हरवला आहे.**
**सापडल्यास सपर्क क्रं ९५२७५१४१३६**



## जाहीर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी गेवराई यांचे न्यायालयात**
**अर्जदार- अशोकराव विठ्ठलराव दुधसागर,**
**रा. मालेगांव बु'' ता.गेवराई जि. बीड**

यांचा अर्ज दि. १०.११.२०२५ अर्जदार श्री. अशोकराव विठ्ठलराव दुधसागर, रा. मालेगांव बु'' ता.गेवराई जि. बीड यांनी त्यांचा मुलगा करण अशोकराव दुधसागर यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती/ या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

प्रमाणपत्र धारकाचे नाव मौ. मालेगाव बु'' ता. गेवराई जि.बीड या ठिकाणी दि. १४.०१.२००६ रोजी जन्म झाला असुन जन्म नोंद प्रमाणपत्र मिळणेसंबंधी तालुका दंडाधिकारी गेवराई यांनी दि. १०.११.२०२५ रोजी जाहिर प्रगटन दिलेले आहे. संबंधीत यांचा जन्म मौ. मालेगाव बु'' येथे झाला आहे का? याबाबत शासन निर्णय क्रं. जन्म/मृत्यू नोंद २५२५/ई.ओ ९९११८१/ प्र.क्र.-२२ कु क. नवीन मंत्रालय, मुंबई दि. १२/३/२०२५ नुसार सदरहु जन्म मौ. मालेगाव बु'' ता. गेवराई येथे झालेला आहे. जन्म येथे झालेला आहे किंवा नाही असे कोणाचे म्हणने असेल वरील जन्मबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

(स्वाक्षरीत)
कार्यकारी दंडाधिकारी, गेवराई



## चौकशीची जाहीर नोटीस

**बदल अर्ज क्रमांक - १३२३/२०२५ कलम- २२**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्र. :- ज्ञानेश्वर परिवार बहुउददेशीय सेवाभावी संस्था, गायकवाड जळगांव, ता. गेवराई, जि. बीड, एफ २१३७५/बीड

**अर्जदार :- श्री परमेश्वर सोनाजी खोसे, रा. गायकवाड जळगाव, ता. गेवराई, जि. बीड)**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

धर्मादाय उप आयुक्त बीड विभाग, बीड हे वर नमुर केलेल्या बदल अर्ज यासंबंधी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यांदर चौकशी करणार आहेत:-

१. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) स्थावर मिळकत:-**

मौजे गायकवाड जळगांव, ता. गेवराई, जि. बीड, येथील गट क्रमांक २११ मधील ३० आरजमीन पैकी १० आर विना मोबदला दानपत्र दस्त क्र. ११८६/२०२५ नुसार संस्थेला दिली असून दानपत्र दस्त खता नुसार जमीनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| गट नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पैसे | या पैकी विक्री क्षेत्र |
| --- | --- | --- | --- |
| २११ | ६.४७ | २०.०२ | माझ्या मालकी कब्जातील ३० आर यापैकी १० आर ही जमीन |

**ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे:-**

(१) पुर्वेस माझी शिल्लक जमिन
(२) पश्चिमेस : अस्मीता हनुमंत आगरकर वैगरेंची जमिन
(३) दक्षिणेसः गेवराई शेवगांव रोड
(४) उत्तरेसः उमापुर जुना रस्ता नगर वाट

सदर मिळकतीची बाजार किंमत र.रु.६,६२,०००/- (अक्षरी र.रु. सहा लक्ष बासष्ट हजार फक्त) सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने स्वतः किंवा विधीज्ञा मार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणार काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त, बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का

(स्वाक्षरीत)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ ●



बीड : येथील नगरपरिषदेच्या स्थायी समितीच्या सदस्यपदी डॉ. सारिकाताई योगेश क्षीरसागर यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना भाजपचे सर्व नगरसेवक.



नवनिर्वाचित नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे यांना शुभेच्छा देताना दैनिक मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे.



श्री. अशोक कदम साहेब उपनिबंधक नांदेड हे नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत आहेत. सेवा निवृत्तीच्या निमित्ताने माननीय श्री.सतीश तोटावार साहेब (जिल्हा उपनिबंधक बीड) यांच्या उपस्थितीत सर्व अधिकारी कर्मचारी यांच्या वतीने साहेबांचा छोटेखानी निरोप समारंभाचा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी सर्वांनी कदम साहेब यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सौंदना गावचे जावई नगरसेवक अँड गोविंद शिराळे पाटील यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

मौजे सौदाना तालुका पाटोदा गावचे जावई उच्चशिक्षित बीड व जिल्हा सत्र न्यायालय येथील प्रसिद्ध वकील एडवोकेट गोविंद भैया शिराळे पाटील यांना मंत्री पंकजा मुंडे यांनी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांच्या प्रमुख प्रचार नं. प. बीड निवडणूक मध्ये अग्रेसर असल्याने आणि त्यांनी शब्द दिल्यामुळे तो शब्द पळाला आहे. या आनंदाने सौंदना गावातर्फे नागरिक सत्कार अँड गोविंद शिराळे यांची बीड नगरपरिषद नगरसेवक म्हणुन निवड झाल्याबद्दल सत्कार शिवाजी कदम, चंद्रसेन कदम, सुधाकर शिंदे,भागवत कदम गणेश भालेकर,राम कदम, संकेत कदम, संतोष कदम, कृष्णा कदम, दादा कदम, सुरेश आगुंडे, कॅसल हॉटेलचे मालक काशिनाथ खुने इत्यादी दिसत आहे.

## मूकनायक व दर्पण दिना निमित्त ३ फेब्रुवारी होणार जिल्हास्तरिय विविध पुरस्कार वितरण सोहळा



माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र पत्रकार संघ आयोजीत प्रतिवर्षा प्रमाने गेवराई येथे मूक नायक व दर्पण दिना निमीत् विविध पुरस्कारचे आयोजन करण्यात आले आहे हा पुरस्कार वितरण सोहळा दिंनाक ३फेब्रुवारी मंगळवार सकाळी आकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद गेवराई येथे भव्यदिव्य होणार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री डॉ,शिरिश कुलकर्णी साहेब पुणे हे आसणार आहेत तंर उद्घाटक म्हणुन गेवराई येथील कर्तव्यदक्ष आधिकारी डिवायएसपी श्री अनिल कटके साहेब तर प्रमुख पाहुने म्हणून आमदार विजयसिंह पंडित, मा. ▶▶ उर्वरित पान २ वर

## ऊसतोडणी दरम्यान मजुराचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू
### कारखान्याने आर्थिक मदत करण्याची मागणी



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चौफाळदरा तांडा येथील ऊसतोड मजूर वैजनाथ गोपीनाथ आडे यांचा ऊसतोडणी दरम्यान हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृत मजुराच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. सविस्तर वृत्त असे की, वैजनाथ गोपीनाथ आडे हे मेलब्रो शुगर्स प्रा. लि., शिरूर, ता. जि. बागलकोट (कर्नाटक) येथे ऊसतोडणीचे काम करत होते. ऊसाच्या फडात काम सुरू असतानाच त्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

# रंग कुणाच्या बापाचा नाही हिरवा - भगवा- पिवळा निळा - पांढरा सर्व रंग निसर्गाचे: अभिनेते सयाजी शिंदे

### ...यापुढे संपूर्ण महाराष्ट्रात होता छत्रपती शिवाजी महाराज सह्याद्री देवराई नावाने देवराई उभा राहणार

शिरूर । प्रतिनिधी

सध्या राज्यात रंगावरून मोठे वादळ उठले असून याचा कारण म्हणजे ठाणे येथील मुंब्रा या ठिकाणी एमआयएमच्या निवडून आलेल्या तरुण नगरसेविका सहर शेख यांनी आपल्या कैसा हराया आणि संपूर्ण मुंब्रा हिरवा करू या वक्तव्याने त्या राज्यभर प्रसिद्ध असून त्यांच्या या वक्तव्याने विविध ठिकाणी राजकीय व सामाजिक वातावरणात पडसाद उमटले आहेत त्याचाच धागा पकडून सुप्रसिद्ध अभिनेते सयाजी शिंदे रंग कुणाच्या बापाचे नाहीत हिरवा पिवळा भगवा निळा पांढरा सर्व रंग हे निसर्गाचेच आहेत आणि सर्वात मोठा सूर्य आहे असं परखड मत छत्रपती शिवाजी महाराज सह्याद्री देवराई उद्घाटन प्रसंगी आपले परखडमत व्यक्त केले. तर ग्रामस्थांनी वृक्षदिंडी काढून झाडे लावून स्वागत केले. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने यापुढे राज्यात ज्या काही देवराई निर्माण होतील त्या छत्रपती शिवाजी महाराज सह्याद्री देवराई या



नावाने नवीन देवराई केली जाईल असेही मत यावेळी शिंदे यांनी व्यक्त केले त्यांनी निर्मित केलेले हेही गाणं प्रजासत्ताक दिनी प्रसिद्ध केले आहे हे गाणं गायिका इंदिरा तेंदोलकर यांनी गायले संगीत दुर्गेश काळे यांनी दिले तसेच शैलेश निसरगंध यांनी गायलेल्या गाण्यावरही सर्वांनी ताल धरला कार्यक्रमाला सुप्रसिद्ध लेखक अरविंद जगताप हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन आलमे गावच्या सरपंच शितल पदोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी आयोजित केला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भूमीतून जुन्नर तालुक्यातून आलमे या गावातून अभिनेते सयाजी शिंदे यांनी विविध घोषणा केल्या. कार्यक्रमाला विभागीय वनाधिकारी, सुपर्ण जगताप वन्यजीव संरक्षक सिद्धार्थ सोनवणे, कासार, शरद इंगवले पत्रकार भारतकुमार पानसंबळ व राज्यभरातून निसर्गप्रेमी पर्यावरण प्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## भगवान गडाच्या माऊली मंदिरासाठी 51 लाखाचा निधी महंत नामदेव महाराज शास्त्री यांच्याकडे सुपूर्त

### उकिर्डा चकला येथील त्रिदिनी सप्ताहाची हनुमंत महाराज सातपुते यांच्या कीर्तनाने सांगता

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील उकिर्डा चकला येथील गणेश जयंती निमित्त बुधवार (दि.२१) रोजी प्रारंभ झालेल्या त्रिदिनी सप्ताहास या कालावधीत गणेश कथा पुराण ह.भ.प हनुमंत महाराज शास्त्री, उदयदेवजी गुजरातकर, काशिनाथ महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन होते शुक्रवार दि.२३ )रोजी भगवान गडाचे महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांच्या उपस्थितीमध्ये हभप हनुमान



महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन होऊन शास्त्रीकडे ५१ लाख रुपये भगवानगड येथे उभारत असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज माऊली यांच्या मंदिरासाठी ग्रामस्थांनी निधी सुपूर्त केला. त्यांच्या आगमनासाठी गावात सडा रांगोळी रथयात्रा काढण्यात आली. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच संजय पानसंबळ, उपसरपंच विजय सानप, ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुख्यमंत्री बळीराजा शेत /पाणंद रस्ते योजना सहभाग नोंदवण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयातील ग्रामीण भागातील शेत/पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी पूर्णपणे यंत्र सामुग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे करण्याकरीता सोपी व सुलभ कार्यपध्दती असलेली मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना ही स्वतंत्र योजना महसूल विभागामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजना राबवण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समिती, स्थापन करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी यांना तालुकास्तरावर विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीस्थापन करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन निर्णयातील सुचनेनुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. प्रकरणात सर्व यंत्रणा गटविकास अधिकारी, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना सदर योजना प्रभावीपणे राबवीण्याबाबत दिनांक १२/०१/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी बीड यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे बैठक आयोजित करून आवश्यक त्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. आज दिनांक २६/१२/२०२६ रोजी मुख्यमंत्री बळीराजा ▶▶ उर्वरित पान २ वर

## तीन अपत्य प्रकरणात घळाटवाडीच्या सरपंचांवर टांगती तलवार

### नामनिर्देशनपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप ; विशाल ससाणेंचे जिल्हाधिकारी न्यायालयात अपील



**ग्रामपंचायत निवडणुकीत दोन अपत्यांचे स्वयंघोषणापत्र देत प्रत्यक्षात तीन अपत्य असल्याची माहिती लपवल्याचा गंभीर आरोप घळाटवाडीच्या सरपंच संगिता येताळ यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणी ग्रामस्थ विशाल चांगदेव ससाणे यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या न्यायालयात अपील दाखल करत सरपंच पद रद्द करण्यासह फौजदारी कारवाईची मागणी केली आहे. जिल्हाधिकारी न्यायालयात वारंवार सुनावण्या ठेवण्यात आल्याने तालुक्यात राजकीय खळबळ उडाली आहे.**

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १४ (ज-१) चे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवत घळाटवाडी (ता. माजलगाव, जि. बीड) येथील विद्यमान सरपंच श्रीम. संगिता हरिभाऊ येताळ यांचे सरपंच पद रद्द करण्यात यावे, अशी ठोस मागणी ग्रामस्थ व ▶▶ उर्वरित पान २ वर

### छ. संभाजीनगर येथे 'स्टार्टअप इकोसिस्टम संवाद' कार्यक्रमाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी (MSInS) आणि मराठवाडा एक्सीलरेटर फॉर ग्रोथ अँड इंक्युबेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्टअप इकोसिस्टम संवाद' हा विशेष कार्यक्रम दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता चखढ कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पाटील हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार असून, महाराष्ट्राची स्टार्टअप दृष्टी, धोरणे तसेच स्टार्टअप क्षेत्रातील विविध संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या संवादात्मक कार्यक्रमासाठी स्टार्टअप्स व उद्योजक, नवोन्मेषक, इन्क्युबेटर्स व एक्सीलरेटर संस्था, विद्यार्थी व युवा नवोन्मेषक, CSR व शाश्वतता क्षेत्रातील प्रतिनिधी, शासकीय विभाग व यंत्रणा, मार्गदर्शक व उद्योगतज्ज्ञ, शैक्षणिक व संशोधन संस्था, एंजेल गुंतवणूकदार व व्हेंचर कॅपिटलिस्ट्स यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात जलसमाधी आंदोलनास प्रशासना कडुन सकारात्मक प्रतिसाद

### तलवाडा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अन्नलदास साहेबांनी आंदोलन व्यवस्थित हाताळले !



तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील त्वरिता गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात संबंधित प्रशासनास गेल्या आणेक महिनो महिण्या पासुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे हे पदाधिकारी संविधानिक पध्दतिने निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्याची मागणी करत आहेत. संदर्भ,, आतिक्रमण धारकांनी ग्रामपंचायतचा कसलाही बांधकाम परवाना नसतांना तलावची संरक्षण भिंत कोरुन तलावास धोखा निर्माण करत पक्की बांधकामे करुन मनमानी चालवत बस स्थानक, प्राथमिक आरोग्य केंद्र, जि. प. शाळा कॉलेज, बाजार तळ कडे जाणा-या मुख्य डांबरी (सिमेंट) रस्त्याला अडथळा निर्माण केलेला आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी या बाबत संबधित प्रशासनास निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात वारंवार मागणी केलेली होती या मागणीला आणुसरुन संबंधित प्रशासनाने आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीस देऊन अर्थिक ▶▶ उर्वरित पान २ वर

**तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण संदर्भात संबंधित प्रशासनाने २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणा-या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिका-यांना एक महिण्यात आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन देऊन तलवाड्यातुन प्रस्थान करताच गावातील ईतर गरजुंनी देखील दत्त मंदिर पासुन समाधी स्थळ ते सार्वजनिक बारव(विहीर) मुस्लिम कब्रस्तान तलावच्या उर्वरित डांबरी रस्त्याने पुन्हा आतिक्रमण केल्याचे प्रजासत्ताक दिनी दिवसभर दिसुन आले. काही सुज्ञ नागरिकांनी या नविन आतिक्रमण धारकांना विचारले की हा काय पौर खेळ लावलाय तर त्यांचे उत्तर होते की तलाव भिंतीचे व डांबरी रस्त्याचे सर्व आतिक्रमण काढा नसता आम्हालाही जागा ध्या!**

## मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना : बीड जिल्ह्यात विकासाचा नवा मार्ग मोकळा, एकाच दिवशी ५६ पानंद रस्ते खुले

### केज तालुक्यात टाकळी शिव रस्त्याच्या मजबुतीकरणास प्रारंभ , तर राजुरी ( न ) मंडळातील मुर्शदपूर – तिप्पटवाडी येथे अतिक्रमणमुक्त पाणंद रस्ता खुला



बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतीपूरक पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ऐतिहासिक स्वरूपाची कार्यवाही सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धोरणात्मक निर्णय व मार्गदर्शनातून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी अतिक्रमणमुक्त शिवार आणि सक्षम दळणवळण या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या योजनेच्या माध्यमातून आज बीड जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ५६ शेत / पाणंद रस्ते खुले करण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः प्रत्यक्ष विविध ठिकाणी उपस्थित राहून रस्ता खुला करण्याची कार्यवाही सुरू केली . प्रशासनाने केवळ आदेशापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांमध्ये जाऊन काम केल्याने ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केज तालुक्यात टाकळी येथे शिव रस्त्याच्या मजबुतीकरणास सुरुवात – ▶▶ उर्वरित पान २ वर